आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक वृत्त विभाग
प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार दिनांक २० सप्टेंबर २०२५
ठळक बातम्या

- इतर देशांवरचं अवलंबित्व हाच भारताचा सर्वात मोठा शत्रू असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं 'समुद्र से समृद्धी' या कार्यक्रमात प्रतिपादन

- एसटीसाठी १७४५० कंत्राटी चालक आणि सहाय्यक भरती प्रक्रिया राबवणार असल्याची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

- अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची ग्वाही

- नागपुरात मेघगर्जनेसह पावसाची जोरदार हजेरी, विदर्भात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट

पंतप्रधान नरेंद्र मोदी - गुजरात

इतर देशांवरचं अवलंबित्व हाच भारताचा सर्वात मोठा शत्रू असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमधे भावनगर इथे 'समुद्र से समृद्धी' या कार्यक्रमातआज ते बोलत होते. आपलं इतर देशांवरचं अवलंबित्व जेवढं कमी होईल तेवढी आपली शक्ती वाढेल असं ते म्हणाले. समुद्र से समृद्धी या कार्यक्रमामध्ये ३४ हजार २००कोटी रुपयांच्या विकास कामांचं उद्घाटन केलं. यामध्ये किनारपट्टीशी संबधित ७ हजार ८०० रुपयांच्या प्रमुख विकास प्रकल्पांचा समावेश आहे. कच्छमधे धोरडो हे गाव पूर्णपणे सौर ऊर्जेचा वापर करीत असून त्याचं लोकार्पण प्रधानमंत्र्यांनी केलं.गुजरातमधे यापूर्वी मोढेरा, सुखी आणि मसाली या गावामधेही पूर्णपणे केवळ सौर ऊर्जेचा वापर होतो.स्वातंत्र्याप्राप्तीच्या शतकपूर्तीपर्यंत म्हणजे २०४७ पर्यंत विकसित व्हायचे असेल तर भारताला आत्मनिर्भर होण्याशिवाय पर्याय नाही. या विचारातून भारताचं सागरी क्षेत्र नवीन सुधारणा करत आहे, असं पंतप्रधान म्हणाले

बुलेट ट्रेन

अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा २०२७मधे सुरु होईल, असं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत सांगितलं. या प्रकल्पाचा ठाणे जिल्ह्यातला टप्पा २०२८ च्या दरम्यान पूर्ण होईल आणि त्यानंतर वांद्रे कुर्ला संकुलातल्या टप्प्याचं काम सुरु होईल असं ते म्हणाले.

नक्षल समर्पण धोरण

प्रतिबंधित संघटना सीपीआय (माओवादी) ने बदलत्या जागतिक आणि राष्ट्रीय परिस्थितीमुळे तसेच पंतप्रधान, गृहमंत्री आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सततच्या विनंतीमुळे शस्त्रे खाली ठेवून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाने सशस्त्र संघर्षावर तात्पुरती बंदी घालण्याचा निर्णय घेतला असल्याचं सीपीआय (माओवादी) चे पॉलिट ब्युरो सदस्य एम. वेणुगोपाल राव यांनी जारी केलेल्या एका ऑडिओ क्लिप द्वारा सांगितलं.

*बदले हुए विश्व एवंम देश के परिस्थितियों के अलावा लगातार देश के प्रधानमंत्री, गृहमंत्री से लेकर वरिष्ठ पुलिस अधिकारियों तक हम हथियार छोड़कर मुख्यधारा में शामिल होने के लिए किए जा रहे अनुरोधों के मद्देनजर हम हथियार छोड़ने के लिए निर्णय लिए हैं।*

केंद्रीय गृहमंत्र्यांशी किंवा त्यांच्याद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्ती किंवा प्रतिनिधी मंडळाशी चर्चा करण्यास तयार असल्याचंही वेणुगोपाल यांनी म्हटलं आहे.

सेवा पर्व

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्व समावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारने आरोग्य सेवेसाठी डिजिटल परिसंस्थेला मजबूत केलं असून त्यामुळे आरोग्य सेवेचे लाभ अधिक सुलभतेने मिळत आहेत. अधिक माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, गेल्या ११ वर्षांत भारताच्या आरोग्यसेवा क्षेत्रात मोठं परिवर्तन झालं आहे. २०१८ मध्ये, सरकारनं 'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY)' सुरू केली. या योजनेअंतर्गत, प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचं आरोग्य संरक्षण मिळतं . भारतातील सर्वात

गरीब अशा ४० टक्के लोकसंख्येला समोर ठेवून, आजवर या योजनेने १२ कोटींहून अधिक कुटुंबांना लाभ दिला आहे. ही योजना म्हणजे जगातील सर्वात मोठा आरोग्य विमा कार्यक्रम आहे.

*सरकार का प्रयास है कि देश के हर बुजुर्ग जिनकी आयु 70 वर्ष के ऊपर है उनको जल्द से जल्द आयुष्मान वय वंदना कार्ड मिले और ये ऐसी योजना है जिसमें आय की कोई पाबंदी नहीं।*

गेल्या वर्षी २९ ऑक्टोबर रोजी , मोदी यांनी 'आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा विस्तार करण्याची घोषणा केली. या अंतर्गत आयुष्मान वय वंदन योजनेद्वारे आता ७० वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

प्रताप सरनाईक

भविष्यात येणाऱ्या ८ हजार नवीन बसेस साठी मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने कंत्राटी पद्धतीने १७४५० चालक आणि सहाय्यक पदासाठी भरती राबविण्यात येणार असून येत्या २ ऑक्टोबरला त्याची निविदा प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण -तरुणींना रोजगार उपलब्ध होणार असून ३० हजार रुपये इतके किमान वेतन त्यांना मिळणार आहे. त्यामुळे या संधीचा पुरेपूर फायदा होतकरू तरुण -तरुणींनी घ्यावा असं आवाहन सरनाईक यांनी केलं.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३०० व्या संचालक मंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, बससेवा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चालक आणि सहाय्यक मनुष्यबळ भाडेतत्त्वावर ३ वर्ष कालावधीसाठी घेण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया अवलंबण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रिया विभाग निहाय राबविण्यात येणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकडून राज्य परिवहन महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध होणार आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

"अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्यासाठी शासन कटिबद्ध असून त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरु आहे. राज्यात

पहिल्या टप्प्यात 73 कोटी 91 लाख 43 हजार तर दुसऱ्या टप्प्यात 553 कोटी 48 लाख 62 हजारांचा नुकसानग्रस्त निधी शेतक-यांना मंजूर झाला आहे. मंजूर केलेला निधी पुढच्या आठवड्यापासून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. ऊर्वरित बाधित जिल्ह्यातील पंचनाम्यांचे काम अंतिम टप्प्यात असून त्यांनाही पुढील काही दिवसात शासन स्तरावर निधी मंजुर होऊन शेतक-यांच्या थेट खात्यावर जमा होईल" अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज वाशिम जिल्ह्याच्या मालेगाव तालुक्यातील अमानी गावाला भेट देत बाधित क्षेत्राची पाहणी केली. 'अतिवृष्टीमुळे ३० जिल्ह्यातील शेतक-यांना मोठं नुकसान झालं आहे. त्यात विदर्भातील वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर नागपूर, गडचिरोली यांचा समावेश आहे असंही त्यांनी सांगितलं.

कृषी मंत्री शिवार फेरी

कृषी यांत्रिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञान आणि पाण्याचा सुयोग्य वापर याद्वारे शेती क्षेत्राच्या विकासासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि कृषी समृद्धी योजनेत शासनाने मोठी तरतूद केली आहे. नैसर्गिक संकटात शेतकरी बांधवांना पाठबळ देण्यासाठी राज्य शासन खंबीरपणे उभे असून राज्यातील एकही अतिवृष्टीबाधित शेतकरी भरपाईपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ परिसरात आयोजित शिवार फेरी आणि चर्चा सत्राच्या उद्घाटन प्रसंगी दिली.

नितीन गडकरी

कुठल्याही समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा सर्वांत मोठा दुवा आहे. हलबा समाजाने आपल्या समस्या सोडविण्यासाठी अनेक वर्ष संघर्ष केला, पण शिक्षणाची कास धरली. त्यामुळेच समाजातील अनेक लोक मोठ्या पदांपर्यंत पोहोचले. पुढेही शिक्षणातूनच प्रगतीचा मार्ग गवसणार आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं हलबा समाज महासंघाच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्याचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते आज झालं . दिनदयाल नगर येथील हलबा समाज महासंघाच्या सांस्कृतिक भवनात झालेल्या या सोहळ्याला माजी आमदार विकास कुंभारे, हलबा समाज महासंघाचे अध्यक्ष डॉ. देवराम नंदनवार, महासचिव डॉ. रमेश पराते यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान

स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियाना अंतर्गत सेवाग्रामच्या महात्मा गांधी आयुर्वेद ज्ञान संस्थेच्या विद्यार्थी आणि डॉक्टरांच्या वतीनं मदनी गावात लठ्ठपणा टाळण्यासाठी जनजागृती रॅलीचं आयोजन करण्यात आलं. या रॅलीमध्ये ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. लठ्ठपणा टाळण्यासाठी साखर , मैद्यासारखे पदार्थ टाळणे त्याचप्रमाणे बैठी जीवन शैली बदलून व्यायाम आणि संतुलित आहाराच्या द्वारे आपले आरोग्य निरामय राखणे असे संदेश रॅली द्वारे देण्यात आले.

महिला क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना आज नवी दिल्लीत होत आहे. ऑस्ट्रेलियाच्या संघाने भारतीय संघापुढे जिंकण्यासाठी ४१३ धावांचं उद्धिष्ट ठेवलं असून शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतीय संघाच्या ५ षटकात १ गाडीबाद ५२ धावा झाल्या होत्या.

हवामान

आज नागपुरात दुपारच्या सुमारास जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि पावसाने काही वेळ वीज गेल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. दरम्यान, संपूर्ण विदर्भात आज आणि उद्या वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट देण्यात आला असून यादरम्यान काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. परवा अर्थात 23 तारखेपासून पुढील काही दिवस हवामान सामान्य राहणार आहे. येत्या काही तासात वर्धा, भंडारा, गोंदिया, अमरावती, चंद्रपूर, यवतमाळ आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी वादळ आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे. नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

*****